तरूण भारत

29 APR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय सेवा योजनेतून समाजाभिमुख दृष्टिकोन

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : एनएसएसचे विद्यापीठस्तरीय बक्षीस वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुख दृष्टिकोन विकसित करण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे (एन. एस. एस.) मोठे योगदान असून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना व उपक्रमांच्या अंमलबजावणीत एन. एस. एस.ने अधिक सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे सन २०१५-१६ मधील विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरण व सन २०१६-१७ ची कार्यनियोजन बैठक असा संयुक्त कार्यक्रम विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, केंद्र सरकार व राज्य शासन यांनी व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टिकोनातून अनेक अभिनव आणि महत्वाचे उपक्रम हाती घेतले आहेत. यामध्ये मतदार जागृती व नोंदणी, जन-धन योजना, डिजिटल इंडिया, जलयुक्त शिवार, स्वच्छ भारत, व्यसनमुक्ती अभियान आदींचा समावेश आहे. त्यांच्यासंदर्भात समाजात जागृती करणे, त्यांना सदर उपक्रम राबविण्यासाठी प्रेरित करणे अशी कामे एन. एस. एस.च्या माध्यमातून अधिक उत्तम प्रकारे करता येतील. त्यासाठी शिक्षक, विद्यार्थी यांनी एनएसएसच्या माध्यमातून काम करणे अपेक्षित आहे. बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या श्रमशक्तीच्या बळावर या जगात अशक्य असे काहीही नाही, याची प्रचिती एनएसएसच्या उपक्रमातून येते. तसेच भरीव कार्याची उभारणी या माध्यमातून होते, असेही गौरवोद्गार काढले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सन २०१५-१६ उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजनेतील पुरस्कार स्वीकारताना प्रा. प्रमोद चौगुले. सोबत अन्य मान्यवर.

केआयटी महाविद्यालयाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ एनएसएस संकेतस्थळाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठस्तरीय तसेच कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हास्तरीय एनएसएस महाविद्यालयीन एकक, कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक व स्वयंसेविका यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सह-समन्वयक डॉ. सुरेश शिखरे यांनी आभार मानले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. जी. चिघळीकर, डॉ. सदाशिव मोरे, डॉ. एस. एन. जाधव, महाविद्यालयांचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक उपस्थित होते.

लोकमत
29 APR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगवे यांच्या विचारांचा वारसा जपूया

## देवानंद शिंदे : दसरा चौकातील जैन बोर्डिंग येथे विलास संगवे अकॅडमीचे उद्‌घाटन

कोल्हापूर : समाजशास्त्र, इतिहास, धर्म अशा त्रिकोणात बहुमोल योगदान देणाऱ्या डॉ. विलास संगवे सरांचा वारसा पुढे नेण्यासाठी त्यांच्या विचारांची ज्योत अकॅडमीच्या माध्यमातून तेवत ठेवावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

दक्षिण भारत जैन सभा, भगवान महावीर अध्यासन केंद्र व दिगंबर जैन बोर्डिंग यांच्या सहयोगाने गुरुवारी सुरु करण्यात आलेल्या समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे अकॅडमीचे उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य श्रीधर हेरवाडे उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ समीक्षक प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. पद्मजा पाटील, उज्ज्वला संगवे आदी उपस्थित होते.

कुलगुरु शिंदे म्हणाले, डॉ. संगवे यांचे समाजशास्त्र या विषयातील योगदान शाहू महाराज यांच्यावरील ग्रंथलेखन हे उल्लेखनीय कार्य आहे. एकाच वेळी समाज, इतिहास व धर्म अशा त्रिकोणात काम करणे सोपे नसते. त्यांनी समाजासाठी दिलेला विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. शिवाजी विद्यापीठाने त्यांचा केलेला सत्कार म्हणजे एका ज्ञानपीठाचा सत्कार होता.

यानंतर प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे 'समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी ते म्हणाले, जैन समाजाला अल्पसंख्याक दर्जा मिळाला यासाठी केंद्र सरकारने ज्या निकषावर हा दर्जा दिला त्यासाठी डॉ. संगवे सरांच्या ग्रंथ सरकारने मार्गदर्शनासाठी निवडले होते. समाजशास्त्रासह अर्थशास्त्राचाही डॉ. संगवे यांचा उत्तम अभ्यास होता. सन १९६६ मध्ये 'मराठीतील पहिले समाजशास्त्र' या विषयावरील पुस्तक त्यांनी लिहिले. त्यांचे लिखाण मूलभूत स्वरुपाचे होते. जगभरातील विविध देशांत त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले आहे. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचे सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. जैन समाजातील ज्ञानपरंपरेचे ते उपासक होते.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य हेरवाडे म्हणाले, महाराष्ट्र जैन साहित्य परिषदेच्या स्थापनेत डॉ. संगवे यांचा महत्त्वाचा वाटा होता. जागतिक सर्व धर्म परिषदेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत असताना त्यांनी जैन धर्मातील तत्त्वे, संदेश आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविली. अकॅडमीच्या माध्यमातून त्यांचे वैचारिक स्मारक होणे ही समाधानाची गोष्ट आहे.

दिगंबर जैन बोर्डिंगचे अधीक्षक राजकुमार चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. दक्षिण भारत जैन सभेचे चेअरमन सागर चौगुले यांनी स्वागत केले. केंद्रीय उपाध्यक्ष प्रा. डी. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. संजय शेटे यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

दीपक जाधव



कोल्हापुरातील दिगंबर जैन बोर्डिंग येथे गुरुवारी सुरु केलेल्या डॉ. विलास संगवे अकॅडमीचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. पद्मजा पाटील, उज्ज्वला संगवे, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, आदी उपस्थित होते.

सकाळ

29 APR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजाभिमुख करण्यात एनएसएसचा वाटा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठस्तरीय पुरस्कारांचे वितरण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुख दृष्टिकोन विकसित करण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) मोठे योगदान आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना व उपक्रमांच्या अंमलबजावणीत 'एनएसएस'ने अधिक सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरण व चालू शैक्षणिक वर्षासाठीची कार्यनियोजन बैठक असा संयुक्त कार्यक्रम राजर्षी शाहू सभागृहात बुधवारी झाला. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''केंद्र सरकार व राज्य शासन यांनी व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टिकोनातून मतदार जागृती व नोंदणी, जन-धन, डिजिटल इंडिया, जलयुक्त शिवार, स्वच्छ भारत, व्यसनमुक्ती अभियान आदी कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्याबाबत जागृती करणे, त्यांना हे उपक्रम राबविण्यासाठी प्रेरित करणे अशी कामे एनएसएसच्या माध्यमातून अधिक उत्तम प्रकारे करता येतील. त्यासाठी शिक्षक, विद्यार्थी यांनी एनएसएसच्या माध्यमातून काम करणे अपेक्षित आहे. छोट्या-छोट्या गोष्टींतून देशसेवा होते हे एनएसएसमधून सिद्ध झाले आहे. या सर्व उपक्रमांकडे सकारात्मकपणे पाहण्याचा दृष्टिकोन समाजाच्या सर्व स्तरांत निर्माण होण्याची गरज आहे.''

बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, ''विद्यार्थ्यांच्या श्रमशक्तीच्या बळावर या जगात अशक्य असे काहीही नाही, याची प्रचिती एनएसएसच्या उपक्रमांतून येते; तसेच भरीव कार्याची उभारणी या माध्यमातून होते.''

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह एनएसएसचे कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. डी. जी. चिघळीकर, सांगली जिल्हा समन्वयक डॉ. सदाशिव मोरे, सातारा जिल्हा समन्वयक डॉ. एस. एन. जाधव आणि महाविद्यालयांचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते. एनएसएसचे कार्यक्रम समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सहसमन्वयक डॉ. सुरेश शिखरे यांनी आभार मानले.

### एनएसएस संकेतस्थळाचे उद्‌घाटन

दरम्यान, केआयटी महाविद्यालयाने तयार केलेल्या शिवाजी विद्यापीठ एनएसएस संकेतस्थळाचे कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. हे संकेतस्थळ निर्माण करणाऱ्या टीमचा सत्कार त्यांच्या हस्ते झाला. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठस्तरीय तसेच कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हास्तरीय एनएसएस महाविद्यालयीन एकक, कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक व स्वयंसेविका यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट असे सत्काराचे स्वरूप होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी कोल्हापूर जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे प्रा. प्रमोद चौगुले. शेजारी डी. आर. मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

लोकसत्ता

29 APR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मतदारांच्या जागरुकतेमुळेच भारतीय लोकशाही प्रगल्भ'

## राजकीय सद्यःस्थितीवर शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

प्रतिनिधी , कोल्हापूर

**भारतीय निवडणूक** प्रक्रियेत मतदार हे सातत्याने कळीची भूमिका बजावतात. त्यांच्या जागरुकतेमुळेच निवडणुकांचा कौल दरवेळी वेगळा असला तरी लोकशाही प्रगल्भ बनविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन प्रा. परिमल माया सुधाकर यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग ,एम.आय.टी. पुणे, तसेच श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतातील सद्यःराजकीय परिस्थिती आणि उदयोन्मुख संधी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आज पार पडली. या परिषदेत ते बोलत होते.

प्रा. प्रकाश पवार यांनी पश्चिम बंगाल, केरळ, तमिळनाडू, पाँडिचेरी या चार राज्यांतील निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय सामाजीकरण, इतिहास, संस्कृती, आणि बदलत्या राजकीय वातावरणासंदर्भात विश्लेषण केले. दक्षिण राज्यांमध्ये भाजप हिंदुत्ववादावर नव्हे, तर आर्थिक विकासावर भर देत असल्यामुळे बहुमत नाही मिळाले, तरी मताची टक्केवारी वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

प्रा. वासंती रासम म्हणाल्या,'' भारताच्या राजकारणाचे स्वरुप झपाट्याने बदलत असल्यामुळे पहिल्यांदा मतदान करणाऱ्या युवकांची संख्या वाढत आहे. तसेच निवडणुकांमध्ये समाज माध्यमांचा वापर मोठया प्रमाणात होत असून निवडणूक प्रक्रिया व्यावसायिकांकडून हाताळली जात आहे. अशा परिस्थितीमध्ये सामाजिकशास्त्र, विधी, व्यवस्थापन शास्त्राच्या विद्यार्थ्यांना या निवडणूक प्रक्रियांमध्ये होणाऱ्या बदलांचा उपयोग आपल्या करिअरसाठी होऊ शकतो.

प्रा. मनिष केळकर यांच्या मते, निवडणुकांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे राज्यशास्त्र व सामाजिक शास्त्रांतील विद्यार्थ्यांना या निवडणुकीच्या बदलत्या स्वरुपामुळे अनेक रोजगार संधी उपलब्ध होतील. राजकीय नेतृत्व, राजकीय विश्लेषक, राजकीय सल्लागार, प्रचार सभा संयोजक, निवडणूक कार्यक्रम आयोजक, वैयक्तिक सल्लागार, निवडणुकीचे इव्हेंट मॅनेजमेंट अशा अनेक संधी उदयोन्मुख युवकांना उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

आशिष लाल यांनी स्वागत केले. डॉ. रविंद्र भणगे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत
29 APR 2016

# समाजशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. आर. बी. पाटील

**ज्यांचे आचरण इतरांसाठी आदर्श ठरते, तो माणूस सर्वांना 'आपला माणूस' वाटतो. असाच एक आपला माणूस म्हणजे शिवाजी विद्यापीठाचे समाजशास्त्र विभागातील विभागप्रमुख गुरुवर्य प्रा. डॉ. आर. बी. पाटील हे ३० एप्रिल २०१६ ला सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे चार शब्द...**

प्रा. डॉ. आर. बी. पाटील सरांनी आपल्या ३६ वर्षांच्या सेवेत, समाजशास्त्र विभागाचे पाच वर्षे प्रमुखपद सांभाळले. बीसीयुडीचे संचालक, शिवाजी विद्यापीठा अंतर्गत भगवान महावीर अध्यासन, गांधी अभ्यास केंद्र, एम.एस.डब्ल्यू. कोर्स, इत्यादींचे समन्वयक म्हणूनही काम केले. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक, इंटरनॅशनल सोशिऑलॉजिकल असोसिएशनच्या रिसर्च कमिटी सोशिऑलॉजी ऑफ पॉप्युलेशनचे बोर्ड मेंबर यावर कार्य करत आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. तसेच मराठी समाजशास्त्र परिषदेचे सचिव, शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

सरांनी विविध महत्त्वाच्या पदावर काम करताना त्यांनी आपल्यातील शिक्षक व संशोधक यावर कधीच अन्याय होऊ दिला नाही. या सर्व कामात त्यांना नेहमी आवडले ते अध्ययन, अध्यापन व संशोधनाचेच कार्य पार पाडले. म्हणूनच तर त्यांनी विविध विषयावरील तीन 'मेजर रिसर्च प्रोजेक्ट' व चौदा मायनर रिसर्च प्रोजेक्ट यशस्वीपणे पूर्ण केले. नऊ संशोधनात्मक पूस्तकांचे लेखन व संपादन, पाच



आंतरराष्ट्रीय पुस्तके, नियतकालिकांमध्ये लेख, २८ पुस्तकात संशोधनात्मक लेख लिहिले. राष्ट्रीय स्तरावरील विविध संशोधन नियतकालीकात ४० संशोधनात्मक पेपर प्रकाशित तर आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवरील एकूण १५७ संशोधन पेपरचे सादरीकरण केले.

समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी, अभ्यासकांनी, विविध सामाजिक विषयातील संशोधनावर भर द्यावा व सामाजिक समस्यांच्या निराकरणात व सर्वांगीण समाज विकासात योगदान द्यावे, अशी अपेक्षा व आवाहन त्यांनी केले आहे. अशा या समजशास्त्राचे अभ्यासक, संशोधक, संशोधन मार्गदर्शक गुरुवर्य डॉ. आर. बी. पाटील सर यांना दीर्घायुष्य लाभो हिच सदिच्छा.

**-प्रा. अशोक चव्हाण**
**विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठवडगाव**

महाराष्ट्र टाईम्स .29 APR 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगवे हे समाजाचे ज्ञानपीठ

## डॉ. विलास संगवे ॲकॅडमीच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरूंचे गौरवोद्गार

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

समाजशास्त्र, इतिहास आणि धर्म अशां तीन क्षेत्रात योगदान देणाऱ्या डॉ. विलास संगवे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज आहे. डॉ. संगवे हे समाजासाठी ज्ञानपीठ होते. डॉ. संगवे यांनी अभ्यासातून मांडलेल्या विचारांची ज्योत ठेवण्याचे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद् शिंदे यांनी केले. दक्षिण भारत जैन सभा, भगवान महावीर अध्यासन आणि दिगंबर जैन बोर्डिंग यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे ॲकॅडमीच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीधर हेरवाडे होते. यावेळी प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. जे. एफ. पाटील, महावीर अध्यासन केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. पद्मा पाटील, उज्ज्वला संगवे आदी उपस्थित होते.



समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे ॲकॅडमीच्या उद्घाटनप्रसंगी सत्कार स्वीकारताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी प्राचार्य डॉ. श्रीधर हेरवाडे डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. जे. एफ. पाटील, महावीर अध्यासनाच्या समन्वयक डॉ. पद्मा पाटील, उज्ज्वला संगवे आदी.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'डॉ. संगवे यांचे समाजशास्त्रं विषयातील योगदान मोलाचे आहे. शाहू महाराज यांच्याविषयी ग्रंथलेखनातून त्यांनी त्यांचा अभ्यास दाखवून दिला आहे. आपल्या ज्ञानाने समाजाला विचार देणारी, दिशा देणारी मोजकी माणसे आहेत, त्यामध्ये डॉ. संगवे यांचा नामोल्लेख केला पाहिजे. शिवाजी विद्यापीठातर्फे त्यांचा सत्कार केला होता. डॉ. संगवे यांचा सत्कार हा व्यक्तीचा सन्मान नसून ज्ञानपीठाचा सन्मान होता.'

डॉ. लवटे म्हणाले, 'समाजशास्त्रासह अर्थशास्त्रावरही डॉ. संगवे यांचा अभ्यास होता. १९६६ साली समाजशास्त्र'या विषयावरील पहिले पुस्तक त्यांनी लिहिले. वि विध आंतरराष्ट्रीय संस्थाचे ते सल्लागार होते. जैन समाजातील ज्ञानपरंपरेचे उपासक होते.'

अध्यक्षीय भाषणात हेरवाडे म्हणाले, 'महाराष्ट्र जैन साहित्य परिषदेच्या स्थापनेत डॉ. संगवे यांचा महत्त्वाचा वाटा होता. जागतिक परिषदेमध्येही त्यांनी जैन धर्मातील तत्वे आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवली. त्यामुळे त्यांचे वैचारिक स्मारक या ॲकडमीच्या माध्यमातून होणे ही चांगली गोष्ट आहे.'

यावेळी दिगंबर जैन बोर्डिंगचे अधीक्षक राजकुमार चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. दक्षिण भारत जैन सभेचे चेअरमन सागर चौगुले यांनी स्वागत केले. केंद्रीय उपाध्यक्ष प्रा. डी. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. संजय शिंदे यांनी आभार मानले.